| MHPU120004122024 | **नियमित दिवाणी दावा क्र.९०/२०२४ मधील नि.क्र.२४ वरील आदेश**<br>श्री. अभिषेक नंदकुमार भिडे<br>**विरुध्द**<br>श्री. सदाशिव उर्फ मिलींद रामेश्वर भिडे. |
|---|---|

प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा कैफियत देण्याकरीता झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन, वाटणीकरीता व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी सांमजस्याने व वडीलधाऱ्या माणसांच्या मध्यस्थीने वादविवाद मिटवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सदरचा प्रयत्न असफल झाला. त्यानंतर प्रतिवादी हे व्यावसायिक कामानिमित्त बाहेरगावी असल्याने विहीत मुदतीत त्यांना कैफियत दाखल करता आली नाही. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्याकरीता विलंब झालेला आहे. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०३.** वादी यांनी नि.२७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी कोणत्या तरतूदीप्रमाणे सदरचा अर्ज दाखल केला आहे हे नमूद केलेले नाही. त्या कारणास्तव सदरचा अर्ज हा फेटाळण्यास पात्र आहे. तसेच प्रतिवादी यांनी विलंबाबाबत स्पष्ट स्पष्टीकरण दिलेले नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**०४.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.३ यांनी विहित मुदतीत त्यांची कैफियत दाखल केली नसल्याची बाब वादातीत नाही. दिवाणी प्रक्रिया संहितामधील तरतूदीनुसार प्रतिवादी यांनी ३० दिवसात त्यांची कैफियत दाखल करणे अनिवार्य आहे. परंतु त्यानंतर न्यायालयाने मुदत वाढविल्यास पुढील ६० दिवसापर्यंत म्हणजेच एकूण ९० दिवसात प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणे अपेक्षित आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात विहित

मुदतीत प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाईकरीता व वाटणीकरीता दाखल केला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.३ यांना कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT Date: 2025.07.17 17:46:54 +0530

**ठिकाण – भोर** **( एस.डी.शिरसाट )**

**दिनांक – १७.०७.२०२५.** **०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**